# छंद पुष्परचनेचा - २४

सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!

पुष्परचना करताना यावेळी ड्रीफ्ट वूडमध्ये केलेल्या रचनेची माहिती देत आहे.

सोबतच्या रचनेमध्ये लाकडाचे खोड वॉर्निशने रंगवून वापरले आहे. लाकडाच्या खोडामध्ये जिथे ओॲसिस बसवणे शक्य आहे तिथे दोन ठिकाणी ओॲसिस तारेने बांधून बसवले आहे. त्यामध्ये पूर्ण ड्रीफ्ट वूडचा आकार विचारात घेऊन फुले/पाने वापरली आहेत. यामध्ये आपण पांढरे ऑर्किड व लालसर केशरी ॲन्थोरियम वापरले आहे.



सोबत दिलेल्या रचनेतील ड्रीफ्ट वूड बरेच मोठे आहे पण अगदी छोट्या पीसमध्येसुद्धा रचना करता येते.



सोबतची अगदी साधी/सोपी व कमी फुलांची मुक्तरचना आहे. यामध्ये पिवळ्या रंगाचे जर्बेरा आणि जांभळे ऑर्किड वापरले आहे. यात साँग ऑफ इंडियाची (भारतातील झाडाचे नाव) फांदी वापरुन रचनेला पूर्णत्व दिले आहे.



सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर
asdssd@gmail.com